**ठळक बातम्या**

- शिक्षक दिनानिमित्त देशाचं शिक्षकांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन, राष्ट्रपतींच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान
- समाजात मैत्रीपूर्ण मतभेद आणि सकारात्मक विचारमंथनाची संस्कृती रुजणं महत्त्वाचं असल्याचं सरन्यायाधीशांचं प्रतिपादन
- आगामी ७२ तास युक्रेनवरचे हल्ले थांबवण्याचा रशियाचा निर्णय
- सात्त्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांचा चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश

**आणि**

- दहीहंडीचा थरार अनुभवताना मुंबई-ठाण्यात १२८ गोविंदा जखमी, दोन जणांचा मृत्यू

**<><><><><>**

राष्ट्रीय शिक्षक दिन आज देशभरात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिकपातळीवर शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शिक्षणक्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या तीन विभागातल्या शिक्षकांना आज नवी दिल्लीत आदर्श पुरस्कार प्रदान करण्यात आले. पदक, रोख रक्कम आणि मानपत्र असं पुरस्काराचं स्वरूप आहे. १२ वर्षांपूर्वी साडे ४ टक्क्यांवर असलेलं प्राथमिक शाळांमधलं विद्यार्थी गळतीचं प्रमाण जवळपास शून्यावर आलं आहे. याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शिक्षकांचं अभिनंदन केलं. भारतीय संस्कृती आणि परंपरेचा आदर राखताना विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणं, मानवतेसाठी काम करणं, अंत्योदयाच्या दिशेनं काम करणं, पर्यावरण रक्षण आणि राष्ट्रहिताला

सर्वोच्च प्राधान्य देण्याची शिकवण विद्यार्थ्यांना देण्याचं आवाहन त्यांनी केलं. यावेळी त्यांनी  डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन आणि डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कर्तृत्वाला उजाळा दिला. स्वतः शिक्षक म्हणून काम करताना आलेले अनुभवही राष्ट्रपतींनी सांगितले. पुरस्कारप्राप्त शिक्षकांमधे महाराष्ट्रातले ९ जण आहेत. बीडच्या कविता गिट्टे, नाशिकच्या कुंदा बच्छाव, लातूरचे वैभव कुलकर्णी, साताऱ्याचे शिवप्रसाद टिंगरे, आयआयटी मुंबईतले विक्रम विशाल, वर्ध्याचे अमर ताकसांडे, सोलापूरचे संदीपान नरोटे, धाराशिवचे किरण झरकर आणि नाशिकच्या अर्चना जाधव यांचा पुरस्कार विजेत्यांमधे समावेश आहे. पुरस्कार सोहळ्यानंतर कविता गिट्टे यांनी सांगितलं…

**होल्ड- बाईट- गिट्टे**

**<><><><><>**

समाजात मैत्रीपूर्ण मतभेद आणि सकारात्मक विचारमंथनाची संस्कृती रुजणं महत्त्वाचं असल्याचं, सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं सुरु असलेल्या  ब्रिक्स सदस्य राष्ट्रांच्या सरन्यायाधीशांच्या  परिषदेला ते आज संबोधित करत होते. तत्पर आणि विश्वासार्ह न्याय प्रक्रिया ही काळाची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं. या परिषदेत ब्राझीलच्या सर्वोच्च फेडरल न्यायालयाचे न्यायाधीश आणि चीनच्या मुख्य न्यायाधीशांसह इतरांनीही आपली भूमिका मांडली.

**<><><><><>**

लोकशाहीच्या प्रक्रियेत स्वायत्त न्यायसंस्था आणि माध्यमांचं महत्त्व मोठं आहे आणि सध्या माध्यमांच्या विश्वासार्हतेवर सगळ्यात मोठं प्रश्नचिन्ह आहे,   असं मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मांडलं. नागपूरमधे भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या माध्यम परिषदेत, 'माध्यमं, नेतृत्व आणि नवी जागतिक व्यवस्था' या विषयावर ते बोलत होते. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायपालिका आणि प्रसारमाध्यमं, या

लोकशाहीच्या ४ स्तंभांच्या जबाबदाऱ्या राज्यघटनेनं स्पष्ट केल्या आहेत. राजकारण आणि राजकीय पक्ष हे लोकशाहीचं सगळ्यात मोठं बलस्थान आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

शिलालेख तसंच सागरी व्यापारापासून गणितापर्यंत आपल्या वारशाचा अभ्यास करण्यासाठी आणि तो पुन्हा आत्मसात करण्याबाबत भारताचा आत्मविश्वास वाढत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्लीत वार्षिक इतिहास पुरस्कार वितरण सोहळा आणि डॉक्टर एस एल भैरप्पा स्मृती व्याख्यान कार्यक्रमात बोलत होत्या. भारताला आता स्वतःच्या वारशाचा अभ्यास आणि आकलन करण्यासाठी इतर कोणाच्याही परवानगीची पप्रतिक्षा करावी लागत नाही असं सीतारामन यांनी सांगितलं.

**<><><><><>**

युक्रेनची राजधानी कीव्हवरचे हल्ले ७२ तास थांबवण्याचा निर्णय रशियानं घेतला आहे. आज मध्यरात्रीपासून हा निर्णय लागू असेल. अमेरिकेचे दूत शांतता चर्चेसाठी कीव्हला येणार असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतल्याची माहिती रशियाचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी दिली.

**<><><><><>**

पर्शियन आखातातील खार्ग बेटाजवळ अमेरिकेच्या लष्करी क्षेपणास्त्राने एका इराणी तेलवाहू जहाजावर आज हल्ला केला. यात कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. दरम्यान या क्षेपणास्त्र हल्ल्याबाबत अमेरिकन अधिकाऱ्यांकडून कोणतीही अधिकृत पुष्टी मिळालेली नाही. खार्ग बेट इराणसाठी  सामरिक आणि आर्थिक दृष्टीने एक महत्वाचं बेट असून सागरी तेल निर्यातीमध्ये हे बेट  महत्वाची भूमिका बजावतं.

**<><><><><>**

२७ नो◌ेव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय बालविवाह विरोधी दिन म्हणून संयुक्त राष्ट्रांनी घोषित केला आहे. २०२४ मधे या दिवसापासून बालविवाहमुक्त भारत अभियानाला प्रारंभ झाला होता. त्यानंतर हा दिवस जागतिक स्तरावर घोषित करण्याची मागणी मार्च २०२६ मधे संयुक्त राष्ट्रात मांडण्यात आली होती. काल संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत यासंबंधीचा प्रस्ताव मंजूर झाला.

**<><><><><>**

चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरी गटात भारतीय जोडी सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी सध्या मलेशियाच्या नूरमोहम्मद अझरीन अयूब आणि तान वी कियोंग या जोडीबरोबर उपान्त्य फेरीत खेळत आहे. भारताची जोडी सलग चौथ्यांदा या स्पर्धेच्या उपान्त्यफेरीत पोहोचली आहे.

**<><><><><>**

महिलांच्या आशिया चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना सुरु आहे. नाणेफेक जिंकून पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

कृष्णजन्मोत्सवानंतर आज महाराष्ट्रात दहीहंडीचा मोठा उत्साह पहायला मिळाला. मुंबईत गिरगाव, लालबाग आणि दादरपासून ते ठाण्यातल्या भव्य मैदानांपर्यंत सर्वत्र धाक्कुमाकुमच्या ठेक्यावर नृत्य करणाऱ्या विविध गोविंदा पथकांमधे हंडी फोडण्याची चुरस होती. राजकारण आणि मनोरंजन जगतातल्या अनेक मान्यवरांनी उत्सवाला हजेरी लावून गोविंदांना प्रोत्साहन दिलं. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी, सक्षम आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी योगदान द्यावं, दहीहंडीच्या उत्सवामधून 'नशामुक्त महाराष्ट्र' संकल्पनेला बळकटी देण्याचं काम करावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दहीहंडी उत्सवात केलं. मुख्यमंत्र्यांनी वरळी, दादर, घाटकोपर येथे आयोजित विविध दहीहंडी उत्सवांना भेट दिली.

मुंबईच्या महापौर रितू तावडे, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. दहीहंडीदरम्यान झालेल्या अपघातांमधे आज मुंबईच्या मालाडमधल्या मालवणी भागात कच्ची भिंत पडून ७ वर्षाच्या एका मुलाचा मृत्यू झाला, तर पुण्यात काल लोखंडी कमान कोसळून एक महिला मृत्यूमुखी पडली. या उत्सवादरम्यान मुंबईत ११८ गोविंदा जखमी झाले. त्यापैकी ८५ जणांवर उपचार सुरू आहेत, तर ३३ जणांना उपचारांनंतर घरी सोडण्यात आलं. ठाण्यात जखमी झालेल्या १० गोविंदांना रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><>**

नेपाळमधल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १ हजार ३४४ वर पोहोचली आहे. पुरामुळे बाधित झालेल्या आठ जिल्ह्यांमध्ये शोध आणि बचावकार्य सुरु असून आतापर्यंत १३ हजार लोकांची सुटका करण्यात आली आहे. मृतदेहांची ओळख पटवण्यासाठी डीएनए चाचणी प्रक्रिया सुरु असली तरी अद्याप केवळ ९६ मृतदेह ओळखून त्यांच्या कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यात  आले आहेत. पूरग्रस्त जलविद्युत प्रकल्पांमधल्या  बोगद्यांमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी नेपाळ, भारत आणि चीनची बचाव पथकं संयुक्त मोहीम राबवत आहेत. या आपत्तीमध्ये चीनकडच्या किमान २१ जणांचा मृत्यू झाला, तर तिबेटमध्ये ५०० हून अधिक लोक बेपत्ता आहेत.

**<><><><>**

माध्यमसम्राट सुभाष चंद्रा यांनी एका कंपनीकडून कर्ज मिळवण्यासाठी आपली मालमत्ता फुगवून दाखवल्याबद्दल आणि नंतर कर्जाची परतफेड न केल्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातल्या या कंपनीला १ हजार ३३३ कोटीचं नुकसान झाल्याबद्दल चंद्रा यांच्याविरोधात गुन्हे अन्वेषण संस्थेनं एफआयआर दाखल केला आहे. या कंपनीनं चंद्रा यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती.

**//<><><><><>//**